तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जावक क्रमांक: तंशिविकापु/विवि/डीबीटी २०१८-१९/२०१९/ 2083 दिनांक : २१.०५.२०१९

**परिपत्रक:**
**(कालमर्यादा २५.०५.२०१९)**

प्राचार्य/संचालक,
शासकीय, अशासकीय अनुदानीत व खाजगी विना अनुदानीत,
पदविका, पदवी व पदव्युत्तर तांत्रिक/व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या परंतु संस्था स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जांच्या तपासणीबाबत...**

**संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, यांचे पत्र जाक्र १८/तशिसं/ईबीसी/२०१८-१९/२३६ दि. २०.०५.२०१९.**

उपरोक्त विषयास व संदर्भिय पत्रास अनुसरून, या विभागीय कार्यालयाचे अखत्यारितील सर्व संस्थांना कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांसाठी **विद्यार्थ्यांनी भरलेल्या परंतु संस्था स्तरावर प्रलंबित** असलेल्या अर्जांची तपासणी **दिनांक २५.०५.२०१९** पर्यंत करुन घ्यावी व विभागीय कार्यालयास (Desk 1) मंजूरीसाठी पाठविण्यात यावे. प्राप्त अर्जाच्या तपासणीच्या अंतिम दिनांकानंतर कोणत्याही स्तरावर पेंडिंग / प्रलंबित राहिलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. याबाबत आपल्या संस्थेमधील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावे.

तसेच, प्रलंबित (संस्था स्तरावर Sent back अंतर्गत असलेल्या) अर्जाबाबतची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण न केल्यास व त्याकारणाने लाभ मंजूर न झाल्यास त्याबाबतच्या अर्जांची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहिल याची नोंद घ्यावी.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

D:\Yogesh Kelkar\EBC 2018-19\circular for 2018-19 remaining applications.docx